महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail :11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

## पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१९-२०
## प्रसिध्दी निवेदन दि.१६.०७.२०१९

********

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी ऑनलाईन केंद्रीय पहिल्या फेरीसाठी अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरणे सुरु आहे. तसेच दि १३.०७.२०१९ व १५.०७.२०१९ सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत व दि. १६.०७.२०१९ सकाळी ११.०० ते ७.०० वाजेपर्यंत अखेर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश घेतलेला आहे, तसेच दि.१७.०७.२०१९ पासून अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरण्यासाठी सकाळी ११.०० वाजल्यापासून उपलब्ध झालेला आहे. सदर भाग-१ व भाग-२ दि.१८.०७.२०१९ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत भरण्यासाठी उपलब्ध राहणार आहे.

पहिल्या गुणवत्ता यादीची माहिती खालील प्रमाणे:-

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | पहिल्या गुणवत्ता यादीसाठी एकूण प्राप्त अर्ज | ६३५६६ |
| २ | प्रवेश दिलेल्या (अॅलॉट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या) | ४८७०१ |
| ३ | प्रथम पसंतीक्रमांक मिळालेल्या विद्यार्थी संख्या | २४३६४ |
| ४ | प्रवेश न मिळालेली विद्यार्थी संख्या | १४८६५ |
| ५ | प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | २६५२० |
| ६ | प्रथम गुणवत्ता यादीत अॅलॉट झालेल्या परंतु अद्याप प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | २१९६९ |
| ७ | प्रवेश नाकारलेले (Rejected) केलेले विद्यार्थी संख्या | १४१ |
| ८ | प्रवेश रद्द (Cancelled) केलेले विद्यार्थी संख्या | ७१ |

**पहिल्या गुणवत्ता यादीत प्रथम पसंतीक्रमाचे कॉलेज मिळूनही प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सूचना :-**

इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२० मध्ये प्रथम गुणवत्ता यादीत प्रथम पसंतीक्रमांकाचे कॉलेज मिळालेले आहे, परंतु काही कारणास्तव काही विद्यार्थ्यांनी अद्यापही प्रवेश घेतलेलो नाही, अशा विद्यार्थ्यांना दुस-या व तिस-या गुणवत्ता यादीमध्ये सहभागी होता येणार नाही, कारण अशा विद्यार्थ्यांचा इ.१० वी बोर्डाचा बैठक क्रमांक व इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा क्रमांक Block (प्रतिबंधित) केलेला आहे. , परंतु इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी पुर्ण झाल्यानंतर प्रतिबंधित केलेल्या विद्यार्थ्यांना चौथ्या प्रवेश फेरीत सहभागी होता येईल. त्यामुळे यापुढे प्रथम पसंतीचे कॉलेज मिळालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे बंधनकारक आहे, त्यासाठी विचारपुर्वक पहिला पसंतीक्रम द्यावा.



Scanned by CamScanner

**पहिल्या गुणवत्ता यादीत अ.क्र.२ ते १० क्रमांकाचे कॉलेज मिळेलेले व प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जाऊन प्रवेश घेतलेले परंतु काही कारणास्तव प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांसाठी सूचना :-**

इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२० मध्ये प्रथम गुणवत्ता यादीत अ.क्र.२ ते १० पसंतीक्रमांकाचे कॉलेज मिळालेले आहे, अशा विद्यार्थ्यांनी कॉलेजमध्ये जाऊन प्रवेश घेतला असल्यास व नंतर घेतलेला प्रवेश रद्द केला असल्यास अशा विद्यार्थ्यांना दुस-या व तिस-या गुणवत्ता यादीमध्ये सहभागी होता येणार नाही, कारण अशा विद्यार्थ्यांच इ.१० वी बोर्डाचा बैठक क्रमांक व इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्जाचा क्रमांक Block (प्रतिबंधित) केलेला आहे. , परंतु इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी पुर्ण झाल्यानंतर प्रतिबंधित केलेल्या विद्यार्थ्यांना चौथ्या प्रवेश फेरीत सहभागी होता येईल.

**प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरतांना करावयाची कार्यवाही :-**

- इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या pune.11thadmission.net या संकेतस्थळावर जावून विद्यार्थ्यांने (Student login) मध्ये जावून पुर्वीचाच लॉगइन आयडी व पासवर्ड टाकावा. शाखा बदल, माध्यम बदल व कनिष्ठ महाविद्यालयाचा पसंतीक्रम बदल करता येईल.
- त्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना Centralized Quota प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंतीक्रम बदल करावयाचा असल्यास किंवा नवीन समाविष्ट करावयाचा असल्यास (My Status) मधील क्रमांक-५ (Centralized Quota Choice Filling Status) समोरील (Filled / Edit Your Chioces) या वरच क्लिक करावे. त्यानंतर (Centralized Quota Choice Filling Status)) ही विंडो दिसेल. त्यानंतर आवश्यक असलेले कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव अंतिम करुन (Save) या बटनावर क्लिक करावे.
- महत्त्वाची सूचनाः- पसंतीक्रम भाग-२ बदल करण्यापुर्वी क्र-६ शेवटचा (Print Form) समोरील (Print Registration Form Part-२) यावर चुकूनही विद्यार्थ्यांने क्लिक करु नये. यावर क्लिक केल्यास जो फॉर्म प्रथम फेरीसाठी पसंतीक्रम होता तोच पसंतीक्रम लॉक होईल. व बदल करता येणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना दुस-या फेरीसाठी कोणताही बदल करता येणार नाही. लॉक झालेला फॉर्म अंतिम समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
- आपला फॉर्म पुढील फेरीसाठी ऑनलाईन जमा होईल.
- जर आपणांस प्रिन्ट हवी असेल तरच (Ok) वर क्लिक केल्यानंतर (My Profile) हे पेज दिसेल. त्याखाली (My Status) मधील अ.क्र.६ शेवटचा (Print Form) समोरील (Print Registration Form Part-II) क्लिक करावे .

**दुस-या गुणवत्ता यादीचे वेळापत्रक खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | दि.१७ व १८ जुलै २०१९ | सकाळी ११ ते ५ वाजता | भाग १ व भाग २ भरण्यासाठी उपलब्ध |
| ३ | दि.२२ जुलै २०१९ | सायंकाळी ६.०० वाजता | दुसरी नियमित गुणवत्ता यादी जाहीर करणे |

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
अध्यक्ष,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१



Scanned by CamScanner